
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५७ वे, अंक २रा, मुंबई । एप्रिल २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 2, Mumbai I April 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



**आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।**
**लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ।।**




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५७वे, अंक २रा,
एप्रिल २०२४
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in





**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ मराठवाडा विभाग मेळावा, दि. ७–४–२०२४, लातूर**



**होलिका उत्सव, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई**




**सार्वजनिक मौजी बंधन सोहळा, अहमदाबाद, गुजरात दि. १९–३–२०२४**


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+ YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
UL LISTED
FM APPROVED
VdS
CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

Best Wishes From

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357


**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

**AKSHAY DEPOSIT***

| | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |

Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years)



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)

Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

# संलग्न संस्था वृत्त

**धुळे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे व खोलगल्लीतील प्राचीन श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान धुळे तर्फे संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या महानिर्वाण (जलसमाधी) दिनी एकनाथ षष्ठी च्या निमित्ताने विशेष अभिवादन कार्यक्रमाचे गणपुले दत्त मंदिर सभागृहात रविवारी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जेष्ठ विचारवंत प्रवचन व निरुपणकार डॉ. सौ. वृंदाताई निफाडकर यांनी संत एकनाथ महाराज यांचे जीवनचरित्र व वाङ्मय या विषयावर सुश्राव्य प्रवचन सादर केले. त्यांनी संत एकनाथ महाराज यांच्या जीवनचरित्रातील अनेक प्रसंग, त्यांची सहनशीलता व शांत स्वभावाचे दाखले देत त्यांचा जीवनपट प्रवचनातून उलगडून दाखवला तसेच या प्रसंगी बालकलाकारांनी सजीव देखावे सादर करून रंगत आणली. या प्रसंगी सौ. रेवती पागे यांनी एकनाथी भारूड सादर केले तसेच सौ. माधुरी रुद्र, सौ. कीर्ती रुद्र व सौ. सुचेता रुद्र, गौरी अडावदकर यांनी प्रार्थना व गवळण सादर केली. महिला सांस्कृतिक मंडळाच्या वतीने जोगवा सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रशेखर पुरोहित यांनी सूत्रसंचालन आशुतोष पूरकर यांनी केले. सौ. वैशाली मेहरुणकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सौ. लीना पांडे यांनी आभार मानले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष सीए राजाराम कुलकर्णी यांनी वर्षभरातील कार्यक्रमाचा संक्षिप्त आढावा घेतला. गणपुले दत्त मंदिर संस्थान चे सचिव आनंद कुलकर्णी यांनी मंदिराच्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. या प्रसंगी श्री गणपुले दत्त मंदिर संस्थानच्या अध्यक्षा धनश्री गरुड, नारायण बोवा समाधी मंदिराचे मठाधिपती हभप भाऊ महाराज रुद्र, वेदमूर्ती रमेश कुलकर्णी गुरुजी, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. रेणुका पेटारे, सांस्कृतिक कार्यक्रम समन्वयक सौ. गितांजली कुळकर्णी, सौ. संध्या कुलकर्णी उपस्थित होते. प्रारंभी दिपप्रज्वलन व प्रतिमापूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शंखनाद, घंटानाद, टाळ वादनाने सभागृहातील वातावरणात नवे चैतन्य निर्माण झाले होते. या प्रसंगी गणपुले दत्त मंदिर संस्थानचे शरदचंद्र देशपांडे, ॲड. गिरीश ओढेकर, सागर देशपांडे, अभय शेंद्रे, माधव बापट तसेच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे विलास क्षीरे, अनिल देशमुख, सीमा जवखेडकर, श्रीमती प्रभा बैकर, अभय देशपांडे, किरण मेहरुणकर, सुनील देशमुख आदी उपस्थित होते. सौ. सुषमा पुरोहित, सौ. मंजुश्री पुरकर, सौ. विभा क्षीरे, सौ. अंजली देशपांडे, सौ. स्वराली देशमुख, सौ. वैशाली पाटील, सौ. समिक्षा राव आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या प्रसंगी भाविकांना प्रसाद वाटपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**सोलापूर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, महिला शाखा, ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने सेवासदन प्रशालेत झालेल्या महिला जागर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, महिला शाखा अध्यक्षा हेमा चिंचोळकर, प्रा. डॉ. नभा काकडे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेच्या व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड उपस्थित होते. मेळाव्यात नुकतीच कर अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या पूजा कांबळे व तलवारबाजी मध्ये राष्ट्रीय पातळीवर सिल्वर पदक मिळवणाऱ्या अपेक्षा सावंत यांचा विशेष सत्कार करण्यात आला. द्वितीय सत्रात सायबर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, प्रांजली काळे, रेश्मा दुधाळ, मच्छिंद्र राठोड यांनी सायबर गुन्ह्यामध्ये महिलांची फसवणूक यावर माहिती दिली. तृतीय सत्रात गुंतवणूक सल्लागार वासंती येळेगावकर यांनी आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. चौथ्या सत्रात भारत पेट्रोलियमचे सेवानिवृत्त अधिकारी सुनील माढेकर यांनी घरगुती गॅसचा वापर व घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली.

मेळाव्यास देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, विजय कुलकर्णी, सतीश पाटील, ॲड. अनिल काकडे, प्रशांत कुलकर्णी, ॲड. मंगला जोशी-चिंचोळकर, क्रांती महिला संघाच्या प्रकल्प समन्वयिका रेणुका जाधव, एन. एस. ओ. पी. प्लस विहान प्रकल्पाच्या प्रकल्प समन्वयिका विजयश्री आमले, फॅमिली प्लॅनिंगच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कवीता चंडक, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा तथा अरुणा गॅस एजन्सीच्या मालक काजल सिंदगी इत्यादी उपस्थित होते. विविध क्षेत्रातील ११० महिला उपस्थित होत्या. प्रारंभी प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन नभा काकडे यांनी केले तर आभार डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्षितिजा गायकवाड, वीरेंद्र परदेशी, अर्चना पारशेट्टी, सुरेखा डबरे, आकाश गायकवाड, करण खानापुरे यांनी परिश्रम घेतले.

* दासनवमी निमित्ताने देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरतर्फे शिशु लहान गट ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मनाचे श्लोक, करुणाष्टके आणि रामरक्षा पाठांतर स्पर्धा घेण्यात आली होती. त्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण बुधवारी संस्थेच्या सभागृहात वेदमूर्ती जयंत फडके गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर होते. याप्रसंगी व्यासपीठावर उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, विजय कुलकर्णी, महिला शाखा अध्यक्ष हेमाताई चिंचोलकर, युवक अध्यक्ष आणि स्पर्धाप्रमुख सुशांत कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. ३ मार्च रोजी सरस्वती मंदिर येथे या स्पर्धा झाल्या होत्या. शिशु लहान गट ते इयत्ता चौथी पर्यंत अशा विविध सहा गटांमधून सुमारे १८५ विद्यार्थी यात सहभागी झाले होते. १२ परीक्षकांनी या परीक्षेचे परीक्षण केले होते. त्यातील सर्व परीक्षकांनी घेतलेल्या निर्णयानुसार ३१ विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. सोलापूर शहरातील विविध शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन संस्थेच्या उपक्रमास बहुमोल साथ दिली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या यादी वाचनाचे काम सुशांत कुलकर्णी आणि शिरीष मंगरुळकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये यांनी केले. आभार कोषाध्यक्ष सतीश पाटील यांनी मानले. कार्यक्रमास कार्यकारणी सदस्य शंकर कुलकर्णी, डॉ. नभा काकडे, शिरीष मंगरुळकर आदींची उपस्थिती होती.

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे दासनवमी निमित्त दासबोध पारायण रविवार दिनांक २५.०२.२०२४ ते ०५.०३.२०२४ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. रविवार दिनांक २५.०२.२०२४ रोजी सकाळी ९ वाजता दासबोध ग्रंथ पुजन त्यानिमित्त पंचोपचार पुजा श्री. नंदकुमार तांबवेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. यात ३० साधक सहभागी झाले होते. पारायण दरम्यान प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी (१ ते ४थी) स्पर्धा शुक्रवार दिनांक ०१.०३.२०२४ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. गट पहिला (पहिली-दुसरी) पाठांतर स्पर्धा - रामभक्त हनुमान स्तोत्र (भीमरुपी महारुद्र), गट दुसरा (३री - ४थी) स्पर्धा - रामकथा कथन.

मुलांनी खूप छान प्रकारे व वेगवेगळ्या कथा प्रस्तुत केला. बक्षीस वितरण समारंभात संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. भगवान आडगावकर, महिला शाखा अध्यक्ष डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर, इतर कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व मुलांना वही व राजगीरा चिक्की असा खाऊ देण्यात आला.

दासनवमीच्या दिवशी मंगळवार दिनांक ०५.०३.२०२४ रोजी सौ. वसुंधरा क्षीरसागर यांचे प्रपंच व परमार्थ याविषयी समर्थांची शिकवण याविषयी प्रवचन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्रवचनानंतर प्रसाद वाटप करून पारायणाची सांगता झाली.

**कल्याण :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण शाखेत सालाबादप्रमाणे ‘श्री एकनाथ षष्ठी’ उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शंखनादाने सुरुवात झाली. महिला वर्गाने पालखीचे व एकनाथ महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन औक्षण केले. श्री. सुधीर जोशी व मंडळीनी मृदुंग व टाळ यांच्या साथीने सुंदर अभंग सादर केले. सुंदर सजवलेल्या पालखीतुन श्री एकनाथ महाराज यांची प्रतिमा व एकनाथी भागवथ हा ग्रंथ होता. विविध नामाचा गरज करीत दिंडी निघाली. उपस्थित सर्व भाविकांनी/सदस्यांनी फेर धरून नाचत आनंद लुटला. संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. दिपक देशपांडे यांनी स्वागत पर भाषणात एकनाथ षष्ठी व संस्थेबद्दल माहिती सांगितली. एकनाथी भागवताचे गेली २५ वर्षे पारायण करणाऱ्या सौ. सविता जोशी यांचा सत्कार कार्यकारिणी सदस्यां सौ. मुग्धा घाटे यांनी केला. श्री. श्रीकृष्ण काळकर यांनी एकनाथई भागवतातील ठळक गोष्टी सांगितल्या. सौ. मंजिरी पसारे व सौ. गीताई काळकर यांनी रंगतदार भारुड सादर केले. श्री. एकनाथ महाराज यांच्या घरी रोज पुरण असायचे, म्हणून प्रसादात पुरण वाटले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठई देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या कार्यकारिणीने मेहनत घेतली. महाप्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**मुंबई :** अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या वतीने दि. १३ एप्रिल २०२४ रोजी संस्थेच्या मुंबईतील यलक्ष्मी नारायणल सभागृहात वासंतिक महिला मेळाव्याचे आयोजन सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत करण्यात आले आहे.

समाजातील मान्यवर महिलांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारासह संलग्न संस्थाच्या महिलांचे सामूहिक गुणदर्शनाचा तसेच अनेकविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संलग्न संस्थांना प्रत्येकी दहा मिनिटाचा वेळ दिला असून त्यांच्या शाखेतर्फे सामूहिक कार्यक्रम (ग्रुप परफॉर्मन्स) असावे. संस्थानी सभासदांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आणि संपर्कासाठीची जबाबदारी सौ. ज्योती जोशी - ९८१९४५०९८०, सौ. अरुणा आग्नहोत्री - ९९३०९१८७८८, सौ. माधवी सरदेशमुख - ९८६७७८२१७९ यांच्याकडे संपर्क साधावा. कार्यक्रमात सहभाग घेणारी व्यक्ती संस्थेची सभासद असणे आवश्यक आहे. पुरुष सभासदांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्यास हरकत नाही. कार्यक्रमाच्या सभागासाठी वरील व्यक्तींशी अथवा कार्यालयाशी संपर्क साधावा.

**अहमदाबाद (गुजरात) :** श्री स्वामी समर्थ मठ नारोल व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ दक्षिणी सोसा., मणीनगर, अहमदाबाद यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे आज मिती फाल्गुन शुक्ल दशमी शके १९४५ मंगळवार दिनांक १९/०३/२०२४ रोजी सकाळी १०.४१ शुभ मुहूर्तावर श्री स्वामी समर्थ मठ, नारोल येथे पाच (५) बटुना सामूहिक व्रतबंध संस्कार श्री. प्रकाश जोशी, अमदावाद ह्यानी गुरुपद स्वीकारून उपनयन संस्कार दिले. बडोदे येथून देशस्थ ऋग्वेदी




ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. शरदभाऊ, सेक्रेटरी श्री. नितीन शाहपुरकर, सौ. माधवी मोगरकर कार्यक्रमास उपस्थित राहून बटूस शुभाशीर्वाद दिले. कार्यक्रम अगदी सुरेख झाला. कार्यक्रमास कार्यकारी मंडळ तसेच अन्य सभासदांनी अथक मेहनत करून तसेच सौ. रीमा अस्नीकरने ही जबाबदारी स्वीकारून आजचा कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक. ह्या कार्यक्रमा साठी वरिष्ठ नागरिकांनी दिलेल्या शुभेच्छा व मंडळातील व अन्य काही मान्यवरांनी व कार्यकारी मंडळातील सर्वांनी आर्थिक सहाय्य केले, श्री. पंकज मुधोळकर ह्यांनी हा सोहळा स्वतः कुटुंबासह हाजर राहून बटूस आशीर्वाद दिले व मंडळास आर्थिक सहाय्यही केले. तसेच श्री. किरण मंगळवेढेकर ह्यांनी पण वेळोवेळी आम्हांस मार्गदर्शन देऊन आमचा उत्साह वाढवला.

**लातूर** : रविवार दिनांक ७/४/२०२४ रोजी शामराव पाटील विद्यालयाचे सभागृह मित्र नगर लातूर येथे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळू मुंबईच्या वतीने मराठवाडा विभाग मेळावा घेण्यात आला या मेळाव्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. बळवंत हरिहरराव देशपांडे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे श्री. प्रभाकर कुलकर्णी, श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. नितीन शहापूरकर हे उपस्थित होते मेळाव्यासाठी मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते नरेश जोशी - संभाजीनगर, श्रीधर देशपांडे - जालना, विकास उमापुरकर - बीड, उत्तम पाटील - हिंगोली, संजय दंडनायक व गोपाळकृष्ण परळकर - धाराशिव, श्रीधराचार्य जोशी - गंगाखेड, परभणी व लातूर शहरातील जगन्नाथ पाटील, भानुदास भातंब्रेकर, प्रविण देशपांडे, विवेक जहागीरदार, प्रविण सोदत्ती, गोविंद शास्त्री चाकुर, सुरेंद्र कुलकर्णी चाकुर, मधुकर कमालनगरकर - उदगीर, आर जी पाटील - उदगीर, महिला प्रतिनिधी सौ. प्रमिला देशपांडे. सौ. मीनाताई कुलकर्णी, सौ. शुभांगी कुलकर्णी, उर्मिला कुलकर्णी, श्वेता देशपांडे, सविता धर्माधिकारी हे उपस्थित होते.

## समर्थांनी साधलेली समाजमनाची जडणघडण

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. ९१४६८५५६९१)**

श्री समर्थ रामदास स्वामी हे जेव्हा तीर्थाटन करत होते तेव्हा त्यांनी भारतीय समाजाचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. हा काळ थोडाथोडका नसून १२ वर्षांचा होता. तसेच भारतातील कुठल्याही एका प्रदेशात किंवा प्रांतात हे भ्रमण मर्यादित नव्हते. संपूर्ण भारतभर दक्षिणेपासून - उत्तरेपर्यंत व पूर्वेपासून - पश्चिमेपर्यंत अशी ही भ्रमंती होती. त्या काळातील मुस्लिम राज्यकर्त्यांच्या अन्यायाला समर्थ अत्यंत जवळून पहात होते. समर्थांनी समाजाचे असे स्वतःहून व जवळून निरीक्षण करणे हे रामदास स्वामींचे वैशिष्ट्य आहे. समर्थ रामदास स्वामींच्या पूर्वी महाराष्ट्रामध्ये नागपंथ, महानुभाव पंथ, वारकरी संप्रदाय असे विविध संप्रदाय व पंथ होते. या सर्व संप्रदायातील महान संतांचा एक महत्त्वाचा उद्देश होता तो म्हणजे मोक्ष प्राप्ती किंवा भगवंत प्राप्ती. त्यायोगे भक्ती किंवा योगाच्या माध्यमातून आध्यात्मिक प्रगती कशी साधता येईल आणि आध्यात्मातील सर्वोच्च अवस्था कशी प्राप्त करता येईल याचाच विचार त्या काळातील सर्व संतांनी केला आणि तशाच प्रकारचा उपदेश ते जनतेस करत होते. समर्थ रामदास स्वामींना मात्र आध्यात्मातील सर्वोच्चा अवस्था कशी प्राप्त करता येईल याचाच विचार त्या काळातील सर्व संतांनी केला आणि तशाच प्रकारचा उपदेश ते जनतेस करत होते. समर्थ रामदास स्वामींना मात्र आध्यात्मिक उन्नती सोबतच सामाजिक उन्नती होणार नाही असे समर्थांना वाटत असावे. समाज व प्रपंच जर नेटका असेल सुरळीतपणे चालत असेल तर आपोआपच प्रत्येकजण हा आपल्या आध्यात्मिक प्रगतीकडे लक्ष देतो असे त्यांना वाटत असावे. त्यामुळे त्यांनी समर्थ संप्रदायाची स्थापना केली

यामध्ये अध्यात्मासोबत शक्ती आणि संघटन यांना अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. त्याकरिता त्यांनी मर्यादा पुरुषोत्तम व आदर्श अशा श्रीरामास म्हणून निवडले. शक्ती आणि संघटन समजून देण्यासाठी मारुतीरायांची भक्ती करण्यास त्यांनी सांगितले. अनेक मारुती मंदिरे त्यांनी भारतभर उभारले. इतकेच नाही तर समर्थांनी दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टींबद्दल त्यांच्या विस्तृत साहित्यामध्ये विविध ठिकाणी लिहून ठेवलेले आहे. त्यामध्ये शरीराची स्वच्छता राखण्यापासून ते हस्ताक्षर कसे असावे इथपर्यंत तसेच मनाला कसे नियंत्रित करावे इथपासून राजकारण कसे करावे इथपर्यंत अशा विविध गोष्टींबद्दल समर्थांनी त्यांच्या साहित्यातून उपदेश केला आणि अनेकांना सन्मार्ग दाखवला. समर्थ समर्थांनी मन सशक्त करण्यावर भरपूर जोर दिलेला आपल्याला दिसतो. श्री मनाचे श्लोक, आत्माराम, श्रीमत दासबोध अशा साहित्यातून त्यांनी मन व शरीर सुदृढ कसे करावे यावर भर दिलेला दिसतो. समर्थांनी अनेक उत्सव जसे रामनवमी उत्सव तसेच हनुमान जयंतीचा उत्सव हे सुरु केले. यामध्ये एकत्रित येऊन साजरे केल्यामुळे लोकांमध्ये एकजूटता तसेच संभाषण कौशल्य विकसित होते हे त्यांना त्या काळीच माहीत होते. समर्थांनी अनेकानेक मठ स्थापन करून प्रत्येक ठिकाणी त्या त्या मठाचा मठाधिपती नेमून दिलेला होता. यावरून सत्तेचे विकेंद्रीकरण करणे दिसून येते. काही मठाधिपती म्हणून स्त्रियांची नेमणूक केलेली दिसते. यावरुन स्त्री पुरुष समानतेबद्दल त्यांचा दृष्टिकोन दिसतो. प्रत्येक मठाला स्वातंत्र्य दिलेले दिसून येते. तरीही समर्थांचे प्रत्येक मठावर नियंत्रणही असलेले पहावयास मिळते. यातून आपल्याला संघटनेशी एक आदर्श बांधणी पाहायला मिळते. ज्याद्वारे समर्थ संप्रदायाचे काम चालत असे अशाप्रकारे समर्थांनी साडेतीनशे ते चारशे वर्षापुर्वीच समाजाची जडणघडण केलेली दिसते. त्या काळात देव देश धर्म यांच्यासाठी झटणारा त्यांच्यासारखा दुसरा कोणीही संत असेल असे मला वाटत नाही. अशाप्रकारची समाजपती असणारी दूरदृष्टी त्यांच्याकडेच असल्याचे पाहायला मिळते.

## मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम

**सौ. स्मिता देशपांडे (मो. ९४२२५३३६५६)**

राम आणि कृष्ण भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत. श्रीरामाचा जन्म अयोध्येत दशरथ राजा व कौसल्या पोटी झाला. त्यांचा जन्म आणि जीवनाने संपूर्ण राष्ट्राला मार्गदर्शन केले. सामाजिक कौटुंबिक, नैतिक राजकीय मर्यादेत राहूनही पुरुष उत्तम कसा होतो याची प्रचिती आपणास मर्यादा पुरुषोत्तम रामाच्या जीवनामुळे येते. विकार, विचार, व्यावहारिक कार्यात त्यांनी कोठेही मर्यादा सोडली नाही. श्रीराम सत्यवचनी, एकवचनी, एक पत्नी, आदर्श बंधु, पूत्र, आदर्श राजा, सच्छिल चारित्र्यवान होते. श्रीराम हे विद्या पारंगत, राजनीतीज्ञ, संगीत, वाद्य, चित्रकला यात प्रवीण असून प्रजाहितदक्ष होते, प्रजेला प्रिय होते, सर्व अस्त्रे जाणणारे होते ह्या सर्व कारणांमुळे त्यांना मर्यादा पुरुषोत्तम म्हटले जाते. सद्गुणांचा सर्वोच्च बिंदू म्हणजे श्रीराम! धर्माच्या सर्व मर्यादा त्यांनी पाळल्या.

विश्वमित्र ऋषि यांनी यज्ञाचे रक्षण दृष्टशक्ती पासून करण्यासाठी रामाला बोलावले होते. परंतू तेथे त्यांनी रामाला जीवनाचे शिक्षण दिले. रामाची मातृ व पितृभक्ती अनुकरणीय आहे. त्यांनी गुरु व आई, वडिलांच्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही. श्रीरामांचे राज्य हे आदर्श राज्य होते. त्या काळात प्रजा सुखी होती. त्यांनी जनतेपुढे आदर्श बंधू, पिता, पूत्र, राजा यांचा आदर्श ठेवला आहे.

श्रीराम ब्रह्मदेवाच्या वंशावळीत ४० व्या कुळात जन्मले. दुष्ट शक्तींनी त्यावेळी भूतलावरील सज्जनांना

त्रासून सोडले तेव्हा त्या दुष्टशक्तींच्या नाशासाठी विष्णूदेवाने भूतलावर अवतार घेण्याचे मान्य केले होते. श्रीराम हे विष्णूदेवांचा सातवा अवतार होते. सुखी प्रजा, समृध्दी व सुबत्ता नांदत असलेल्या राज्यास आजही रामराज्य संबोधले जाते.

प्रभू श्रीरामचंद्राचे सामर्थ्य व पराक्रम यांची झलक त्यांच्या बालपणापासून दिसून येते. राम आणि सुग्रीव यांची मैत्री आदर्श होती. वालीला मारण्यासाठी राम सुग्रीवला मदत करतो तर रावणाला मारून सीतेला परत आणण्यासाठी सुग्रीव रामाला मदत करतो. त्याला थोडे दुःख झाले तरी रामाच्या डोळ्यात अश्रू येत असत. मित्र असावा रामासारखा व शतूही असावा रामासारखा असे लोक म्हणत. कारण रावणाच्या मृत्युनंतर विभीषणाने अग्नीसंस्कार करण्यास नकार दिला होता. मृत्युबरोबर वैर संपत असते म्हणून आपल्या भावाला अग्नीसंस्कार दे, तू जर हे काम करत नसशील तर मी करतो. रावण तुझा भाऊ होता तसा माझाही होता असे रामाने विभीषणाला सांगितले. व नंतर रावणाच्या आत्म्याला सद्गती दिली. रामाचे सीतेवर अमर्याद प्रेम होते. सीताही जन्मोजन्मी रामासारखा पती मिळावा म्हणून कामना करीत होती. त्या दृष्टीकोनातून रामाचा सीता त्याग आत्मबलिदानाच्या उच्चतम भावनेचे प्रतीक आहे. रामाला आपली जन्मभूमी अतिप्रिय होती. वालीला मारल्यानंतर किष्किंधा नगरीचे राज्य सुग्रीवला आणि रावणाला मारल्यानंतर लंकेचे राज्य रामाने विभीषणाला दिले होते. परंतु रामाला या राज्याचा किंचितही मोह झाला नाही.

मंथरा आणि कैकयीमुळे रामला राज्यभिषेकाऐवजी वनवास भोगावा लागला. तरीही रामाने कुणालाही दोषी ठरविले नाही व नशीबालाही दोष दिला नाही आणि राम पित्याची सत्ता राज्य सोडून वनवासात गेला तेव्हा मार्गावर दिसणाऱ्या कोणत्याच गोष्टींचा मोह त्याला झाला नाही व रामाबरोबर सामान्यजनता देखील रामाबरोबर वनवासाला जाण्यासाठी तयार झाली. राम जेथे तेथे जनता राहील. रामाशिवाय अयोध्येत आमचे काय काम? असा प्रश्न उपस्थित करून जनतेने आपल्या राजाबद्दलचे प्रेम व्यक्त केले. जेव्हा प्रभूरामचंद्र रावणावर विजय मिळवून परत आले तेव्हा त्याच्या विरहाने व्याकूळ झालेली जनता/प्रजा रामराजाला भेटण्यास धावून आली व सर्वांना आनंद झाला. त्या प्रित्यर्थ सर्वांनी गुढ्या, तोरणे उभारुन रामाचे स्वागत केले. तद्नंतर रामाने सर्वांचे दोष व दुःख दूर केले. प्रजेसाठी आदर्श राजा बनून प्रजेसाठी सीतेचा त्याग केला व आदर्श लोकशाही राजाचा आदर्श घालून दिला. भगवान राम त्रेता युगातील युगपुरुष होते. त्यांच्या युगात धर्म तीन पायांवर उभा असतो. मात्र रामराज्यात असा विलक्षण योग आला की सत्-युगापेक्षा धर्माला चांगली स्थिती आली. जेव्हा राम वनवासाला निघाला तेव्हा भरताने त्यांच्याबरोबर जाण्याचा आग्रह धरला तेव्हा रामाने लक्ष्मणाला राज्याचे महत्त्व समजावून सांगितले व अयोध्येतच रहाण्यास व राज्य करण्यास समजावून सांगितले तेव्हा कैकयीला देखील आश्चर्य वाटले होते. श्रीराम धर्माचे त्राता व जितेंद्रिय, कृतज्ञ सत्यवादी होते हे यावरून दिसून येते. आदर्श अशा बंधुप्रेमाचा आदर्श त्यांनी घालून दिला.

वनवास गमन करताना रामाने उत्तमोत्तम अशी वस्त्रे, अलंकार यांचा त्याग करून वळकले धारण केली, केसांचा जटाभार बांधळा परंतू या कशाचाही त्यांना मोह पडला नाही व खांद्यावरील धनुष्याचा त्यांनी कधीही त्याग केला नाही. राघवाने पित्याचे वचन पाळण्यासाठी राज्यलक्ष्मीचा त्याग करून १४ वर्षे वनवास भोगला व कैकयी बद्दल कुठलाही द्वेष मनात न ठेवता तिला नमस्कार करण्यासाठी ते गेले होते हा प्रसंग रामाचे व्यक्तिमत्व दर्शवतो, त्यावर प्रकाश टाकतो. श्रीरामांनी विश्वमित्रांच्या यज्ञात विघ्ने आणणाऱ्या राक्षसांचा संहार केला व रावणाचा वध करून बंदिवासातून सर्व देवतांची सुटका केली त्यामुळे सर्व देवतांनी रामावर पुष्पवृष्टी केली होती. श्रीराम अनाथांचा नाथ, भक्तांचे कैवारी असून आपल्या दासाचे, भक्तांचे रक्षणकर्ते आहेत.

# ऋतूराज वसंत

**संगीता कुलकर्णी** (मो. ९८७०४५१०२०)

वसंत पंचमी पासून वसंतोत्सव सुरु होतो हे देशभर मानले जाते. वसंत ऋतू म्हटलं की मनात अनेक गोष्टी रुंजी घालू लागतात. वसंत ऋतू म्हणजे नववर्षाची सुरुवात.

भारत देश हा ऋतूंचा देश म्हणून ओळखला जातो. या भारत देशामध्ये सहा ऋतू हे प्रामुख्याने एका मागून एक येतात. या येणाऱ्या प्रत्येक ऋतूचे विशेष महत्त्व आहे. या सर्व ऋतूंमध्ये वसंत ऋतू हा प्रत्येकालाच आवडणारा असा ऋतू आहे. वसंत ऋतूला 'ऋतुराज' असे सुद्धा म्हटले जाते. सर्व 'ऋतूंचा राजा' म्हणून वसंत ऋतू ओळखला जातो.

कुसुमाकर असेही त्याचे एक यथार्थ नाव आहे. कारण नवीन पोपटी चकचकीत, तजेलदार हिरव्यागार पालवीबरोबर अनेकानेक वृक्षवेलींच्या फुलण्याचा, बहरण्याचा हा काळ असतो. वसंत ऋतूचे वैभव हे अनन्य साधारण आहे. वसंत ऋतूला सर्व ऋतूंमध्ये सर्वात महत्त्वाचे स्थान आहे.

वसंतोत्सव म्हणजे निसर्गाचा उत्सव आहे. निसर्ग हा अन्य ऋतूंमध्येही सुंदर दिसतोच. परंतू वसंत ऋतूचे आगमन होताच निसर्गाचे सौंदर्य सुंदरता अधिकच खुलते. त्याचे रुप काही औरच असते.

आपल्या जीवनात यतारुण्यल ही हा वसंत ऋतूच असतो नाही का... त्याचप्रमाणे वसंतही निसर्गाची युवावस्था आहे बरं.

वसंत ऋतू सुंदर, मोहक आणि आकर्षक असतो. वसंत ऋतूच्या आगमनाने संपूर्ण सृष्टीही आनंदाने फुलून जाते.. फुलून निघते.

खेळकर वसंत आपल्या अंगावरची राजेपणाची वस्त्रे उतरवून आपल्या या खेळकर चैतन्यमय खेळात निसर्ग देवतेलाही सामील करून घेतो. त्यांचा हा कौतुक सोहळा पाहण्यासाठी सहसत्ररश्मीही आकाशात उशिरापर्यंत रेंगाळतात.. रेंगाळू लागतात. आणि नेहमीच्या पोपट कोकीळ या परिचित पक्ष्यांबरोबरच तांबट, बुलबुल या साऱ्यांची गर्दी ऋतुराजाच्या स्वागतासाठी होते.

वसंतऋतू म्हणजे समस्त सृष्टीला हसवणारा, नटवणारा, रिझवणारा, तापवणारा, सुकविणारा आणि तृप्त करणारा सृष्टचा प्रियकर..! वसंत ऋतूला ज्ञानेश्वर महाराजांनी काय सुरेख म्हटलं आहे पहा.. 'जैसे ऋतूपतीचे द्वार। वनश्री निरंतर, वोळगे फळभार। लावण्येसी..' तर कवी कालीदासांनी वसंताला 'योद्धा' म्हटले आहे. मदनाची सर्व आयुधे घेऊन फुलविण्यासाठी आलेला योद्धा..!

ऋतूराज वसंताचं आगमन झालं की साऱ्या निसर्गाला जणू आनंदाचं भरतं येते. चराचर सृष्टी हर्षोल्हासानं गाऊ लागते. माणसाच्या मनातही आपसूक गाणं उपलत जातं. भारतीय सण, पुराणकथांचे नायक-नायिका यांच्या जीवनातही वसंत अलवारपणे विरघळून गेलेला आढळतो.

वसंत या शब्दांतच काही जादू असावी असे मला वाटते कारण वसंत नावे असलेल्यांनी वसंतऋतू प्रमाणेच आपली आयुष्ये समृध्द केली आहेत. आपल्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. साहित्यातले वसंत कानेटकर, वसंत काळे (व. पु. काळे), वसंत सबनीस, वसंत बापट यांनी वसंत फुलविला. तर रंगभूमीवर आपल्या अभिनयाने वसंत नटवला ते वसंतराव देशपांडे, वसंत शिंदे, वसंत ठेंगडी यांनी आणि आपल्या जादुई सुरावटींनी मनामनातले वसंत फुलवले ते वसंत देसाई, वसंत प्रभू यांनी..!

असा हा वसंत ऋतु तुमच्या आमच्या जीवनात येतो आनंद देतो तेव्हा म्हणावेसे वाटते, 'चोहीकडून तो

वसंत येतो, हासत नाचत गाणे गातो'..!!

वसंत ऋतूमध्ये थंड हवा सतत फिरत असते आणि वातावरण सुद्धा चांगले असते. कोकिळा सुद्धा आपल्या मधुर आवाजात गोड गाणे गाते.

निसर्ग माणसाला शहाणा करत असतो असे म्हणतात.तर ऋतुचक्र काहीच न बोलता कितीतरी भाव प्रकट करत हे म्हणणे किती योग्य आहे हे पटवून देत राहतो.. राहत असतो.. सुख आणि दुःख हे ऋतूप्रमाणेच आयुष्यत येत राहणारच. या दोन्ही ऋतूमध्ये आनंद घेत जगण्याचा संदेश मला मोलाचा वाटतो. जर्मनीत वसंताच्या वाटेवर चेरीचा बहर तर भारतात घरासमोरचा गुलमोहराचा बहर.. आणि आंब्याचा मोहोर आसपास दरवळत राहतो.

वसंताचे आगमन ही सृष्टीसाठीदेखील एक सुंदर कलाटणी असते. शिशिराची पानगळती संपवून वसंताची चाहूल लागताच कोकीळेचे कूंजन कानावर पडू लागते. झाडावर फुटलेली नवीन पालवी वसंतोत्सवाची वर्दी देते. निष्पर्ण झालेली झाडे इवल्याशा पानांनी साजिरी दिसू लागतात आणि पाहता पाहता निसर्गाचे रूप पालटू लागते. याच काळात रसिकजनांना साहित्य संगताची मेजवानी मिळावी म्हणून वसंत व्याखानमाला, वसंत संगीत महोत्सव इ. कार्यक्रमांची आखणी केली जाते. दूरदर्शनपूर्वीच्या काळात असे कार्यक्रम लोकांचे मनोरंजन आणि प्रबोधन करत असत. आजच्या मोबाईल युगात या कार्यक्रमांचे स्वरुप जरी पालटले असले तरीही सातत्य कायम आहे हे मात्रं नक्कीच...




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

THE NEW INDIA ASSURANCE CO. LTD.

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance Specialist

# जोडीदार निवडा

वधुवर विभागातील मुला मुलींच्या माहितीचा संग्रह वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यासाठी एक उपाय म्हणून आम्ही, ही माहिती नि:शुल्क प्रसिद्ध करण्याचे ठरवले आहे. तरी आपण आपले उपवर मुल-मुली यांची माहिती आपल्या समाचार पत्रिकेमध्ये देण्यासाठी संपादकांशी संपर्क करावा. सोबत आपण असे निवेदन द्यायचे आहे की सदर माहिती ही समाचार पत्रिकेमध्ये प्रकाशित करण्यास मी पालक म्हणून माझी सहमती आहे. विवाह झाला अथवा ठरल्यास तशी माहिती संपादकांना कळवणे गरजेचे आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या माहितीच्या आधारे पालकांशी संपर्क करताना आपली काही जबाबदारी असते याचे पण भान असावे. प्रत्येकाने आलेल्या टेलिफोनला, पत्राला ठराविक वेळेत उत्तर देणे. आपली माहिती परिपूर्ण असावी. अंकात प्रसिद्ध झालेल्या माहितीच्या सत्यतेची जबाबदारी प्रत्येक पक्षाने चौकशी करून आपसात चर्चा करून खात्री करून घेणे गरजेचे आहे. संपादक या माहितीच्या सत्यतेविषयी खात्री देऊ शकत नाही.

## वधू पाहिजे

* **जय शिरीष देशपांडे**, जन्म दिनांक: ८ नोव्हेंबर १९९६, जन्मवेळ - सायंकाळी १९.०७, रास - कन्या, चरण ४थे, गण- देव, नाडी - आद्य, रक्तगट - O+VE ओ +, शाखा - देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्मगाव - जळगाव (खान्देश), नक्षत्र - हस्त, वर्ण - वैश्य, उंची - ५.८, गोत्र - कामकायन, शिक्षण - BE, MBA-, वास्तव्य - ठाणे, नोकरी - सेल्स इंजिनियर (Auto Control Proses Instrumentation Ambarnath, Thane) उत्पन्न - वार्षिक रु.५ ते ७ लाख, अपेक्षा - पदवीधर, ब्राह्मण, मनमिळाऊ, नोकरी (प्राधान्य नाही), संपर्क- ९३२२८८६७४७

* **शशांक सदानंद धामणकर.** जन्म तारीख : २८.०८.१९८३, जन्म वेळ : सकाळी १०.२०, शिक्षण : B.E. Mechanical, नोकरी : B. E. Mechanical वार्षिक उत्पन्न : ९.५ लाख, ब्राह्मण पोटशाखा : कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र : आग्नरस, रक्तगट : O+ve, उंची : ५.८, वर्ण : सावळा, जन्म स्थळ : गोरेगाव (मुंबई), बांधा : मध्यम, जन्म-लग्न कुंडली : रास : मेष, गण : देव, नाडी : आद्य, चरण : प्रथम, गोत्र : आग्नरस, नक्षत्र : अश्विनी, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : श्री. सदानंद विश्वनाथ धामणकर, संपर्क क्रमांक : ९८९३६२७३०२ / ९२७०९९५१६३ / ७३७८३०७२७०, अपेक्षा : अनुरुप, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची चालेल, नोकरीस प्राधान्य.

* **पुष्कर दिलीप मेहुणकर.** जन्म तारीख : ०८.०१.१९९०, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : हरीतस, उंची : ६.१, वर्ण : गोरा, शिक्षण : १२ वी पास (बी.सी.ए. दुसरे वर्ष), व्यवसाय : शेअर मार्केट, डे ट्रेडींग, वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख, अपेक्षा : मनमिळावु, नोकरी असलेली चालेल, संपर्क क्रमांक : ९८६९४१३०८६, ९८६९४६९१६१.

## वर पाहिजे

* **तेजस्विनी अशोक कोटलगी** (घटस्फोटीत) : जन्म तारीख : ०१.०९.१९९१, शिक्षण : P. G. Diploma Mass Comm., नोकरी / व्यवसाय : फोटोग्राफी, Clothing Business, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : काश्यप, रक्तगट : B+ve, उंची : ५.५, वर्ण : गोरा, रास : वृषभ, **कौटुंबिक माहिती :** वडिलांचे नाव : अशोक कोटलगी, संपर्कासाठी दूरध्वनी : ९९६७८४८१०६, ९८९२६१४८९८ अपेक्षा : मुंबई शहर स्थायिक, आधुनिक विचार सरणीचे कुटुंब, शाकाहारी, दिसायला देखणा, वयातील अंतर ३ पर्यंत.

* **निमिषा मनोज पटवर्धन** : जन्म तारीख : १२.०५.१९९८, जन्म वेळ : १६.४१, शिक्षण : Master in Pharmacy, नोकरी / व्यवसाय : Ozone Pharmaceuticals – New Delhi (Excutive), ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : कोंडिल्य, रक्तगट : O+ve, उंची : ५, वर्ण : गोरा, जन्म स्थळ : ग्वालेर, रास : वृश्चिक, गण : देव, नाडी - मध्य, **कौटुंबिक माहिती :** वडिलांचे नाव : मनोज पटवर्धन, संपर्कासाठी दूरध्वनी : ९८९३४५४१५३ / स्वाती पटवर्धन ९९९३१७०४१८, अपेक्षा : Well settled, Supportive Family.

# मनी धरावे, ते ते होते

**वैद्य प्रशांत अनंत सुरु (मो. : ९८२२८८५९५२)**

दि. २२ जानेवारी २०२४ रोजी राम जन्मभूमी अयोध्या नगरीत श्री रामलला बालमूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत होती. माझा नातू चि. ज्ञानांशचा वाढदिवस २१ जानेवारी रोजी होता. ज्ञानांश व त्याचे आई-वडिल-प्रचीती व विशाल यांनी यावेळच्या वाढदिवशी थीम म्हणून राम व रामकथा ठरवली. त्याचे सारे मित्रमैत्रिणी यांनी रामकथेचेच नाटक, गाणी आणि पोशाखही राम/सीता-हनुमान-अंगद-विभिषण-लक्ष्णण-भरत-शतुघ्न असे शोभेसे केले होते. मन भरून आले. पुढच्या पिढीला खरे तर फँटसी हिरोंची व्रेझ असते. पण या नवीन पिढीनेही- खरे सुपर हिरो - मर्यादा पुरुषोत्तम रामाची व्रेझ जपलेली पाहून माझे डोळे पाणावले आणि माझ्या मनाने उचल खाल्ली की, आपण लवकरात लवकर अयोध्येला जाऊन दर्शन घ्यायला हवे.

लगेच ३० जानेवारीचे रात्री राम जन्मभूमी मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष-स्वामी गोविंददेव गिरी महाराजांची दर्शन भेट झाली. आता मात्र साक्षात रामरायांनीच हसे. एम. एस. पाठवलाय तर पाऊल आपणच पुढे टाकायला हवेच- अशी अंतःप्रेरणा झाली. दोन दिवसात विचार करून परममित्र सुनीलजी लोंढे यांचे ट्रेडविंग्जकडून १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या पुणे ते अयोध्या (दिल्ली मार्गे) व परत असे एकट्याचे परतीचे तिकीट काढवून घेतले. काही विचार मनात आला, म्हणून जाताना २२ फेब्रुवारी २०२४ चे सकाळचे आणि दोन रात्री अयोध्येत राहून २४ फेब्रुवारी २०२४ चे परतीचे तिकीट हाती आले. दोन दिवसांनंतर माझे मनी आले की, आमचे कुलोपाध्याय ऋग्वेदभूषण वेदमूर्ती प्रकाशजी दंडगे यांचेशी संपर्क करून अयोध्येत काय-काय व कसे पाहायचे, हे विचारुन घेऊ। माझी कन्या वैध प्रचीती हिलाही हा विचार सांगितला! पण रामकृपा असेल तर - मनी धरावे ते ते होते। विघ्न अवघेची नासून जाते। कृपा केलिया रघुनाथे। प्रचीती येते।। हे मी प्रत्यक्ष अनुभवले.

वेदमूर्ती दंडगेशास्त्री व त्यांचा सहकारी वर्ग यापूर्वीही अयोध्येला ट्रस्टचेवतीने चालू असलेल्या यज्ञ अनुष्ठान कार्यासाठी ४ नोव्हेंबर २०२२ पासून जात होतेच. म्हणून तर त्यांचे मार्गदर्शन हवे होते. तेवढ्यात सायंकाळी स्वतः दंडगेशास्त्रींचाच फोन आला, म्हणाले य१६ फेब्रुवारी २०२४ पासून परत अयोध्येला जाणार आहे. आपण मागे इच्छा बोलून दाखविली होती येणार का?ल

मला साक्षात रामरायानेच आवतंण धाडले. नाही कसा म्हणेन. त्यांनी श्री. यशवंतराव कुलकर्णी - सद्गुरु ग्रुप, पुणे यांचेशी संपर्क करायला सांगितला. मी लगेचच रात्री ९ वाजता, उशीर झाला असून संपर्क केला. माझी उपस्थिती नक्की केली. कुलकर्णी सरांनी अधिक विस्ताराने सांगितले की, य०४.११.२२ पासून सुरु असलेल्या यज्ञ अनुष्ठानाची समाप्ती आहे. त्याला यजमान म्हणूनच यावे. वेळ थोडा आहे. तिकीटे मिळतील का बघा!ल मी तात्काळ हो म्हटले. सर पुढे म्हणाले, '२२ तारखेला पोहचायलाच हवे. २३ फेब्रुवारी रोजी पूर्णाहुती होईल. त्याला यजमानपदी बसा. तिकीटाचे कसे जमवाल?'

प्रत्यक्ष रामरायांनीच नियोजन केल्यामुळे याच दिवसांची तिकीटे माझ्यासाठी नक्की झाली होती. तीन दिवस आधीच! हा नक्की योगायोग नव्हता. नियतीची योजना आपणास काय ठाऊक? आता रामरायाच्या दर्शनाची ओढ लागली. गुरुजी १६ फेब्रुवारीला अयोध्येत अनुष्ठान स्थळी पोहोचले. साऱ्या विश्वस्तांनी या अनुष्ठानाकरता सुमारे १७ महिने स्वतंत्र इमारत वास्तू सद्गुरु ग्रुपसाठी दिली होती. अत्यंत अवघड अशा आर्थिक, नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक अडी-अडचणींवर मात करत पुण्याच्या सद्गुरु ग्रुपने हा अनुष्ठान संकल्प पूर्ण करत आणला. महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यातून ५/५ वैदिक / याज्ञिक पूर्ण पंधरवडाभर अयोध्येत हे अनुष्ठान

विनाखंड करीत होते. यांचे पौरोहित्य करायलाच वेदमूर्ती दंडगे गुरुजी या दीडवर्षात ३/४ जाऊन आले होते. स्वतः कुलकर्णी (यशवंतराव) स्वखर्चाने पंचेचाळीस वेळा जाऊन राहून सेवा करून आले. त्यांचे सहकारी सचिव प्रणव कुळकर्णींनी आय.टी. मधील नोकरी सांभाळून अठरा हेलपाटे घेतलेच. साधारणपणे एकशेसाठहून अधिक मराठी वैदिक/याज्ञिक यांनी कोणतेही मानधन न घेता केवळ रामसेवा म्हणून हे अनुष्ठान पूर्ण करीत आणले होते आणि त्याची पूर्ण अनुष्ठानाची पूर्णाहुती करण्याचे भाग्य मला रामकृपा, गुरु कृपा, कुलोपाध्याय कृपा आणि कुलकर्णीसरांनी दिलेली न भूतो अशी संधी यामुळेच प्राप्त झाली. या पुर्णाहुती साठी राम जन्मभूमी न्यासाचे अध्यक्ष श्री. चंपतराय, कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी, प्रतिष्ठापनेचे यजमान अनिल शर्माजी, राम मंदिराचे विद्यमान व्यवस्थापक गोपाळदासजी हजर होते. त्यांसह पुण्याचे दंडगे शास्त्री, घाटे शास्त्री, पुजारी गुरुजी, जोशी गुरुनी (डोंबिवली) व पुणे वेदपाठ शाळेचे प्रमुख अशी मांदियाळी होती.


मला पूर्णाहुतीला हजर राहता येणार आहे, हे सुनील लोंढे यांना कळताच, त्यांनीही माझ्याबरोबर स्वतःचेही तिकीट काढले त्यांचेही हातून पुण्यकर्म घडले. या मोठ्यांचा सहवास आणि मार्गदर्शन लाभले. स्वामीजी तर म्हणाले की, 'पूर्णाहुती केलीत तर वेगळ्या मोक्षाची गरजच नाही!'

सकाळच्या मंगळ आरतीवेळी अर्धातास साक्षात राममूर्तीपुढे उभा होतो. मध्ये इतर कोणी नाही अखंड अश्रुधाराच वाहात होत्या. स्वतःच्या पूर्वपुण्याईने नाही तर पूर्वज आई वडिल आणि आयुर्वेदाचे गुरु वैद्य दातार शास्त्री यांची ही पुण्याई. त्यामागे श्री ज्ञानेश्वर माऊली, मुक्ताई, श्री निवृत्तीनाथ, श्री सोपान काका, पांडुरंग आणि सर्व संतांची कृपादृष्टी यामुळे हा अनन्य अनुभव आला. समर्थ रामदासांचे आराध्य श्री हनुमान यांचे गढीतील दर्शन, शरयुमातेची आरती आणि अयोध्यापुरीची यात्रा सफल झाली. आयुष्याची इतिकर्तव्यताच!

श्री राम मंदिर झाल्यावर अयोध्येला जायचंच! असा ध्यास घेतलेल्या स्वर्गीय पत्नी सौ. प्रफुल्लताची ही हौस माझ्या देहाने पूर्ण केली. ती सोबत होतीच. म्हणूनच रामकृपा झाली! सांगण्यासारखे अनंत आहे! ज्ञानांश-प्रचीती-विशालला दर्शन होवो, एवढी साधी प्रार्थना आहे. रामाने तथास्तु म्हणावे. श्रीराम!

## वाचकास सप्रेम आवाहन

समस्त वाचकास असे आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी समाचार अंकातील प्रसिद्ध झालेल्या लेखांविषयी व्यक्त व्हावे तसेच समाचार कडून असलेल्यांआपल्या अपेक्षांविषयी पण आपले विचार मांडावेत आपल्या पत्रांना समाचार मधून योग्य प्रसिद्धी देण्यात येईल मात्र आपले विचार मोजक्या शब्दात लिहिलेले असावेत. अंकाच्या पानांची मर्यादा लक्षात घेता हा नियम करावा लागत आहे. अशी पत्रे प्रकाशित करण्याचा अधिकार संपादकांना आहे. त्या विषयी चौकशी किंवा पत्रव्यवहार करू नये.



**सर्व सभासद, जाहिरातदार, देणगीदार व हितचिंतक यांस**

# श्रीराम नवमीच्या

**हार्दिक शुभेच्छा...**

# श्री यश टूर्स

सेंट्रल रेल्वे हौसींग सोसायटी,
प्लॉट नं. ४१, कल्याण रोड,
डोंबिवली ( पूर्व ) ४२१२०१.

आयोजक : श्रीकांत पाटसकर मोबा. : 9819148002


## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| हिमालयातील २ धाम<br>केदारनाथ, बद्रीनाथ, हरीद्वार व ह्रषिकेश | जुन १५ — ७ रात्र<br>खर्च प्रत्येकी रु. ३२,००० + विमान |
| हिमालयातील ४ धाम<br>केदारनाथ, बद्रीनाथ, यमनोत्री व गंगोत्री<br>हरीद्वार व ह्रषिकेश | सप्टें. १८ — ११ रात्र<br>खर्च प्रत्येकी रु. ४५,००० + विमान |
| काशी व अयोध्या | ऑगस्ट २० व २८ — ४ रात्र<br>खर्च प्रत्येकी रु. २०,००० + विमान |
| काशी, प्रयाग व अयोध्या | ऑगस्ट २० व २८ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रु. २५,००० + विमान |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, गरुडेश्वर<br>पोयचा ( स्वामी नारायण मंदिर )<br>व बडोदा | ऑक्टो. ४ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रु. १५,००० + रेल्वे |
| राजस्थान ( मारवाड ), जयपुर, जोधपूर<br>पुष्कर व ओसियन वाळवंट | ऑक्टो. १३ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रु. २८,००० + विमान |

टीप : २ धाम व ४ धाम नॉन ए.सी. हॉटेल वास्तव्य

सुचना : - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing) ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व भोजन ( दोन वेळचं ), स्थळदर्शन व मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.

# भावपूर्ण श्रद्धांजली



अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ भूतपूर्व गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन, प्रसिद्ध उद्योगपती श्री एन बी एस कुलकर्णी यांचे १७/३/२०२४ रोजी मुंबई येथे वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील हांदूर येथील श्री. नरहरी उर्फ एन. बी. एच. कुलकर्णी हे ब्राह्मण जातीतील असामान्य व्यक्तिमत्व. उद्योगप्रिय एन. बी. एच. कुलकर्णी यांनी इस्त्रायल देशाचे आणि भारताचे औद्योगिक व्यापारी संबंध अधिकृतपणे प्रस्थापित करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी, तत्कालीन विदेश मंत्री स्व. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या मदतीने मोलाची मदत झाली आहे. सन १९९५ साली भारतरत्न तोडीचा समजला जाणारा इस्त्रायल सरकारचा सर्वोच्य नागरी पुरस्कार श्री. एन. बी. एच. यांना प्रदान करण्यात आला. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजासाठी त्यानी ५० वर्षे अविरत कार्य केले आहे. शैक्षणिक, सामाजिक कार्यात देखील त्याचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. मुलुंड मुंबई येथील विद्या प्रसारक मंडळाच्या सी.बि.एस.सी. नामांकित (देशातील पहिल्या तीन मधील) स्कुलचे संस्थापक होते. आंतरराष्ट्रीय रसायनाच्या उद्योगबद्दल त्यांना बी बी एन ग्लोबल तर्फे सन २०१८ मध्ये मानाचा पुरस्कार देखील देण्यात आला आहे. हजारो ब्राह्मण कुटुंबाना मदत करणारे श्री. एन. बी. एच. कुलकर्णी यांना अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाकडून भावपूर्ण श्रद्धांजली. एनबीएच कुलकर्णी परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.




*With*
*Best*
*Compliments*
*From*

**S E**

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

## सौ. अरुणा अग्निहोत्री



एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. विविध संस्थाच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होणाऱ्या सौ. अरुणाताई अनेकांना परिचित आहेत. यांचे शिक्षण BSC, CAIIB, LLB, PGDBM असे झाले असून त्या बँक ऑफ इंडियात ४० वर्षे सर्व्हिस करून वरिष्ठ बँक मॅनेजर या पदावरून निवृत्त झाल्या आहेत. बँकेत काम करत असताना ऑल इंडिया बँक ऑफिसर्स कॉन्फेडरेशन या अधिकाऱ्यांच्या शिखर संस्थेमध्ये राष्ट्रीय पातळीवर त्यांनी उपाध्यक्षा म्हणून कार्य केले आहे. तसेच बँकेच्या महिला शाखेच्या त्या अध्यक्ष म्हणून प्रतिनिधित्व करत आल्या आहेत. निवृत्ती नंतर त्या आदरणीय समर्थ भक्त श्री. मकरंद बुवा यांच्या प्रवचनाने भारावून गेल्या. त्यांच्या कृपा प्रसादाने त्यांना अध्यात्माची गोडी लागली. अध्यात्मातून सामाजिक काम साधता येईल यासाठी त्या क्रियाशील आहेत. समर्थभक्त, समर्थांचा वैचारिक वारसा जपणारे, समर्थ विचारांचे पाईक आणि ज्ञानसंपन्न, अभ्यासू वक्त्या म्हणून सौ. अरुणा अग्निहोत्री प्रसिद्ध आहेत. समर्थ विरचित दासबोध, मनोबोध, आत्माराम, करुणाष्टके, आणि समर्थांच्या सर्वच वांग्मयाचा आणि समर्थ विचारांचा प्रचार व प्रसार त्या देशभर फिरून करू इच्छितात. आपण समाजाचे देणे लागतो यासाठी आपल्या अभ्यासपूर्ण कीर्तन प्रवचनांद्वारे लोकजगृती करीत आहेत. सौ अरुणा या मध्यवर्ती मंडळाच्या आणि मुलुंड संस्थेच्या क्रियाशील सभासद आहेत याचा मंडळाला अभिमान वाटतो.सौ अरुणा अग्निहोत्री यांच्या अध्यात्मिक प्रवासास खूप खूप शुभेच्छा!




**लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले मुंबई येथे दि. ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी खाद्यजत्रा आयोजित करण्यात आली होती. विलेपार्ले संस्थेच्या आणि मध्यवर्ती संस्थेच्या सभासद सौ. ज्योती जोशी व श्रीमती सीमा आपटे आणि श्रीमती वैशाली कुर्लेकर यांनी सहभाग घेतला होता. मोकळी भाजणी आणि नाचणीची आंबील या पारंपरिक पदार्थास या तिघींना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. अभिनंदन!**

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## महाराष्ट्र शासनाचा एक्सपोर्ट एक्सलन्स अॅवॉर्ड स्वीकारताना श्री. मिहिर घोटीकर, संचालक, एचडी फायर प्रोटेक्ट प्रा. लि.




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH